MAHAVITARAN (TM)
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
““Prakashgad, Plot No.G-9' Anant Kanekar Marg, Bandra[ East],Mumbai-400051
Website : www.mahadiscom.in

# " महावितरण "

## 'जाहिर सुचना'

१. विद्युत कायदा २००३ चे कलम ६२ आणि ६४ यांमधील तरतुदींनुसार महावितरण कंपनीने वार्षिक महसुली गरजेसंबंधीची याचिका (२८ फेब्रुवारी २००६) आणि वीजदर प्रस्ताव (२६ मे २००६) यांच्या सारांशासहित इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांतील वृत्तपत्रांतून सार्वजनिक सूचना प्रसिध्द करणे आवश्यक आहे. महसूली गरज आणि वीजदर यासंबंधीची याचिका दाखल केल्यानंतर, तसेच ७ एप्रिल २००६ रोजीचे प्रारंभिक विधिग्राहयता सत्र आणि २२ जून २००६ रोजीचे अंतिम तांत्रिक विधिग्राहयता सत्र यांमध्ये झालेल्या चर्चेनुसार केलेले बदल विचारात घेऊन ही आधारसामग्री (data) अद्ययावत करुन समाविष्ट करण्यात आली आहे.

२. आर्थिक वर्ष २००६-०७ करिता वार्षिक महसुलाची गरज व तदनुरुप वीजदर प्रस्ताव दाखल करण्यामागील उद्दिदष्टः-

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) हे विद्युत कायदा २००३ चे कलम ६१ आणि ६२ अनुसार तात्पुरत्या हस्तांतरण योजनेच्या आधारे आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीजदराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ अनुसार आर्थिक वर्ष २००४-०५ मधील प्रत्यक्ष खर्च व महसूल, सप्टेंबर २००५ पर्यंतच्या प्रत्यक्ष रकमा यांच्या आधारे आणि २००५-०६ या वर्षातील ऑक्टोबरपासून व पुढे, तसेच आर्थिक वर्ष २००६-०७ करिता एकूण प्रस्तावित महसुलाची गरज व तदनुरुप वीजदर याचिका सादर करीत आहेत.

- महावितरण यांनी या आधीच्या ५ किंवा ३ वर्षातील संयुक्त वार्षिक वाढ संयुक्तिक मानून आणि राज्यभर अंमलात आणावयाच्या तीव्र भार नियमनाचा परिणाम विचारात घेऊन मीटरधारक प्रवर्गांबाबतीत वीज विक्रीचा अंदाज तयार केला आहे.

- महावितरण यांनी महानिर्मिती कंपनी, केंद्र शासनाची विद्युत केंद्रे, रत्नागिरी गॅस अँड पॉवर प्रा.लि., व्यापारी व अपंरपरागत ऊर्जा इत्यादि स्त्रोतांकडून एकूण ७८४५३ द.ल. युनिट वीज खरेदी करण्याचे ठरविले असून त्याकरिता अंदाजे रु.१७३५९ कोटी रकमेचे प्रदान करावे लागणार आहे.

- वेतन पुनरिक्षण, महागाई भत्यातील सर्वसाधारण वाढ, मूळ वेतन व अन्य भत्ते यांमध्ये ४% किरकोळ वाढ इत्यादि खर्चांचा परिणाम लक्षात घेऊन कर्मचाऱ्यांवरील खर्चाचे अंदाज तयार केलेले आहेत.

- आस्थापना विषयक व सर्वसाधारण खर्चाचे अंदाज ५% वाढ गृहित धरुन केले आहेत.

- देखभाल व दुरुस्ती यांवरील खर्च ५% वाढ धरुन अंदाजित केला आहे.

- आयोगाच्या वीजदर आदेशाच्या आधारे घसारा अंदाजित केला आहे.

- दीर्घ तात्पुरत्या हस्तांतरण योजनेअन्वये महावितरण यांच्या वाटयास आलेली अदत्त कर्जे, अतिरिक्त कर्जे व त्यांच्या परतफेडीचा कार्यक्रम विचारात घेऊन दीर्घकालीन कर्जावरील व्याजाचे निर्धारण केले आहे. व्याजाचा सरासरी दर १३.४% (२००१-०२) वरुन सुमारे ११.० (२००४-०५) असा कमी झालेला आहे आणि आणखी घट होऊन तो २००५-०६ आणि २००६-०७ या आर्थिक वर्षांत ८.३% होईल अशी अपेक्षा आहे.

- भांडवली खर्च, आर्थिक वर्ष २००५-०६ आणि २००६-०७ करिता अनुक्रमे रु.११४२.७ कोटी आणि रु.२८२९.७ कोटी असा अंदाजित केला आहे. भांडवली खर्चाकरिता कर्ज : भागभांडवल यांचे प्रमाण ७०:३० असे गृहित केले आहे.

- आर्थिक वर्ष २००६-०७ करिता महावितरण यांच्या प्रस्तावित भाग भांडवलावरील परताव्यावर आयकराचे प्रदान ३३.६६% (आणि त्यावर ३०% कर, १०% अधिभार व २% उपकर) या सध्याच्याच परिणामकारी दाराने करावे लागेल, असे मानण्यात आले आहे.

- वार्षिक महसूली गरजेसंबंधी याचिकेच्या प्रयोजनार्थ, राज्यातील अधिकृत पारेषण उपक्रम म्हणून असलेल्या महापारेषण कंपनीची एकूण महसूलाची गरज महावितरण कंपनीच्या एकूण महसुलाच्या गरजेतून वसूल करण्यात येईल, असे महावितरण यांनी गृहीत धरले आहे.

- महावितरण यांनी निव्वळ स्थिर मत्तेवर आर्थिक वर्ष २००४-०५ आणि २००५-०६ मध्ये ४.५% परतावा मिळेल असा अंदाज केला आहे. २००६-०७ या आर्थिक वर्षी, वर्षारंभीच्या खुल्या भाग भांडवलावर १६% दराने प्रमाणकानुसार परतावा मिळेल असा अंदाज आहे.

३.	आर्थिक वर्ष २००४-०५, २००५-०६ आणि २००६-०७ करिता एकूण महसुलाची गरज आणि विद्यमान वीजदरानुसार महसुलात येणारी कमतरता यांविषयीचा गोषवारा :-

**रुपये कोटीत**

| **अनु. क्र.** | **तपशील** | **मागील वर्ष (२००४-०५) अलेखापरीक्षित** | **चालू वर्ष (२००५-०६) अंदाजित** | **आगामी वर्ष (२००६-०७) अपेक्षित** |
|---|---|---|---|---|
| १. | वीज खरेदीवरील खर्च | १०७०६.९ | १२७९०.४ | १७३५८.९ |
| २. | सं. व सु. विषयक खर्च | १७४७.६ | १८६५.५ | २०४५.७ |
| २.१ | कर्मचाऱ्यांवरील खर्च | १३६०.५ | १४५६.४ | १५६४.६ |
| २.२ | प्रशासनविषयक व सर्वसाधारण खर्च | १२१.०० | १२७.०० | १३३.४ |
| २.३ | दुरुस्ती व देखभाल यांवरील खर्च | २६६.०० | २८२.१ | ३४७.७ |
| ३. | घसारा (त्यासाठीचा अग्रिमासहित) | ५११.४ | ५४०.७ | ५९९.२ |
| ४. | दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ३४९.०० | १८०.९ | २७८.७ |
| ५. | खेळते भांडवल आणि ग्राहकांकडील सुरक्षा प्रतिभूती यांवरील व्याजासह इतर व्याज आणि वित्त आकार | १२३.७ | २६०.७ | ३४८.४ |
| ६. | निर्लेखित केलेली बुडित येणी | २०९.९ | २१९.९ | २३८.१ |
| ७. | इतर खर्च (तपशील स्वतंत्रपणे दिला आहे) | १३०.२ | १२२.७ | १३७.४ |
| ८. | आयकर | ००.० | १०८.५ | १६०.९ |
| ९. | पारेषण परवानेधारकांना प्रदान केलेले पारेषण आकार | १५८९.६ | १६६८.४ | १८५४.४ |
| १०. | आकस्मिकता निधीकरिता वर्गणी | - | ४४.८ | ४९.७ |
| ११. | एकूण महसूली खर्च | १५३६८.३ | १७८०२.५ | २३०७१.३ |
| १२. | भाग भांडवलावरील परतावा | १२२.५ | १२९.०० | ४७८.०० |
| १३. | एकूण महसुलाची गरज | १५४९०.८ | १७९३१.५ | २३५४९.३ |
| १४. | वजा (-) वीजदराव्यतिरिक्त उत्पन्न | ९८५.९ | १०२१.८ | १०५९.४ |
| १५. | फुटकळ वीजदरातून आवश्यक असलेला महसूल | १४५०४.९ | १६९०९.८ | २२४८९.९ |
| १६. | विद्यमान वीजदरातून मिळणारा महसूल | १३९९१.८ | १५५०८.६ | १८९४२.२ |
| १७. | महसुलात येणारी कमतरता | ५१३.१ | १४०१.२ | ३५४७.८ |

४.	**वितरण हानी/वीज गळती:-**

२००४-०५, २००५-०६ आणि २००६-०७ या आर्थिक वर्षांतील वीज प्रविष्टी, वीज विक्री आणि वीज गळती यांचे अनुक्रमे प्रत्यक्ष, अंदाजित व अपेक्षित परिमाण पुढील तक्त्यात दिले आहे. वर्ष २००६-०७ मध्ये, मागील अनुभवाच्या आधारे आणि दीर्घकालील फळे देणारी प्रस्तावित भांडवली गुंतवणूक लक्षात घेऊन वितरण गळतीमध्ये २% घट अपेक्षित केली आहे.

**(दशलक्ष युनिटमध्ये)**

| अनु. क्र. | ऊर्जा संतुलन | आर्थिक वर्ष | | |
|---|---|---|---|---|
| | | **२००४-०५** | **२००५-०६** | **२००६-०७** |
| १. | महाजेनको यांच्याकडून वीजखरेदी | ४७१३१ | ४६४५९ | ४७७९८ |
| २. | अन्य स्त्रोतांकडून वीज खरेदी | २००४३ | २३२७२ | ३०६५४ |
| ३. | **उपलब्ध वीज प्रविष्टी:** | ६७१७४ | ६९७३१ | ७८४५३ |
| | १. मीटरनुसार वीज विक्री | ३४३४६ | ३६४५७ | ४०९०५ |
| | २. बिगरमीटर वीज विक्री (निर्धारित) | ८६३६ | ९४९९ | १२३४९ |
| | ३. जमा बिलींग | ५८१ | ५८१ | ५८१ |
| | **एकूण विक्री :-** | ४३५६२ | ४६५३७ | ५३८३४ |
| | **वितरण हानीतील घट** | - | २.००% | २.००% |
| १. | वितरणातील गळती (महावितरण) | ३१.००% | २९.००% | २७.००% |
| २. | पारेषाणातील गळती (महापारेषण) | ६.०१% | ६.००% | ६.००% |
| | महावितरण यांची विद्युत ऊर्जेची गरज | ६३१३६ | ६५५४७ | ७३७४९ |
| ३. | पारेषण यांची ऊर्जेची गरज | ६७१७४ | ६९७३१ | ७८४५३ |

## ५. नियामक दायित्व आकार :-

आयोगाने, अतिरिक्त पारेषण व वितरण हानीचा खर्च भरुन काढण्यासाठी कमी दाब वाणिज्यिक, LTPG, HTP-I, HTP-II आणि रेल्वे यांसारख्या सबसिडायझींग ग्राहकांना ५० पैसै /युनिट नियामक दायित्व आकार लावण्यात यावा, हा आकार, पा. आणि वि. हानीमध्ये भावी काळात घट होईल तेव्हा वीजदर कमी करण्याच्या उपायाने त्या ग्राहकांना परत करण्यात यावा असे वीजदर आदेशात [२००३-०४] सुचविले आहे.

नियामक दायित्व आकाराद्वारे प्राप्त केलेला महसूल भावी काळात ग्राहकांना परत करावा लागेल हे महावितरण यांना मान्य आहे. तथापि २००४-०५ आणि २००५-०६ मध्ये या आकाराद्वारे महसूल मिळवून देखील महावितरण यांना महसुलात तूट आली आहे. त्यामुळे सदर आकाराद्वारे मिळालेला महसूल परत केला जाईल त्याप्रमाणात महसूलातील तूट वाढेल आणि ती सर्व ग्राहकांकडून वसूल करावी लागेल. आणखी असे की, वर्ष २००४-०५ मधील वितरण हानीशी तुलना करता २००५-०६ मधील हानीत घट झालेली असली तरी सदर आकाराद्वारे मिळालेला महसूल; वितरण हानीतील निर्धारित घटीशी तुलना करता अधिक कमी केलेल्या हानीच्या प्रमाणामुळे झालेल्या बचतीमधूनच केवळ परत करता येऊ शकेल. तथापि, आयोगाने विहीत करुन दिलेल्या हानी पातळीपेक्षा प्रत्यक्ष हानीचे प्रमाण अद्यापही अधिक असल्यामुळे नियामक आकाराद्वारे प्राप्त केलेला महसूल परत करणे सध्यातरी शक्य होणार नाही.

| आर्थिक वर्ष | नियामक दायित्व आकारापोटी बिलींग (रु.कोटीत) |
|---|---|
| २००३-०४ | ३१३.१ |
| २००४-०५ | १०५४.४ |
| २००५-०६ | ११६३.८ |
| एकूण :- | २५३१.३ |

६. **भार नियमन व त्याविरुध्द वीज खरेदीचा खर्च :-**

आर्थिक वर्ष २००४-०५, २००५-०६ आणि २००६-०७ यांमध्ये करावे लागलेले भार नियमन (मे.वॉ. व द.ल.यु.), वीज खरेदीवरील एकूण खर्च (रुपये कोटीत) आणि वीज खरेदीवरील सरासरी खर्च (रु./कि.वॅा.तास) यांची वर्षनिहाय अनुक्रमे प्रत्यक्ष, प्रत्यक्ष व प्रस्तावित आकडेवारी पुढील तक्त्यात दिली आहे. मागणी -पुरवठयातील अंतर हे भार नियमनातील वाढीमागचे आद्य कारण असून त्यामुळेच महाग वीज खरेदी करणे आवश्यक झाले.

| अनु. क्र. | तपशील | आर्थिक वर्ष | | |
|---|---|---|---|---|
| | | २००५ | २००६ | २००७ |
| १. | शिखर मागणी (मे.वॅा.) | १२७४९ | १४०६१ | १४६०० |
| २. | कमाल मागणीच्या वेळेची उपलब्धता (मे.वॅा.) | ९७०४ | ९८५६ | १०१०० |
| ३. | कमाल मागणीच्या वेळेतील भार नियमन (मे.वॅा.) | ३०४५ | ४२०५ | ४५०० |
| ४. | कमाल मागणीच्या वेळेतील भार नियमन (द.ल.युनिट) | ३८.८५ | ६६.५ | ७०.४३ |
| ५. | वीज खरेदीचा एकूण खर्च (रु.कोटीत) | १०७०६.९ | १२७९०.४ | १७३५८.९ |
| ६. | वीज खरेदीचा सरासरी खर्च (रु./कि.वॅा.तास) | १.५९ | १.८३ | २.२१ |

७. **प्रदानाची इच्छा :-**

वीज खरेदीच्या परिमाणातील वाढीमुळे महावितरण यांना भार नियमनाची समस्या काही अंशी सौम्य करणे शक्य होते हे खरे; तथापि, वीज खरेदीवरील हा खर्च ग्राहकांकडून वसूल करावयाचा असल्याने वीजदरात वाढ करणे अपरिहार्य आहे. भार नियमनकाळात वीजेच्या भरपाईसाठी अधिक दराने प्रदान करावयाचे अतिरिक्त ओझे सहन करण्याची ग्राहकांची इच्छा असो वा नसो, भार नियमन काढून टाकण्यासाठी / कमी करण्यासाठी वाढीव वीजदराचा बोजा सहन करण्याची त्यांची इच्छा त्यांनी कळविली पाहिजे.

वरील समस्येवर अलिकडेच पुणे शहर प्रविभागात एक अभिनव उपक्रम यशस्वीपणे अंमलात आणण्यात आला. तेथील ज्या उद्योगांकडे स्वयंवापरासाठी वीज निर्मिती सुविधा आहे, ते उद्योग कमाल मागणीच्या वेळेत राज्यातील वीज जाळयातून वीज घेणे थांबवून स्वतःच्या सुविधेद्वारा निर्माण केलेली अतिरिक्त वीज वापरतात. परिणामी, राज्याच्या वीज जाळयातील शिलकी वीज त्या भागातील भार नियमन कमी करण्यास वापरता येते. स्वतःची वीज निर्मिती सुविधा असलेल्या उद्योगांनी द्यावयाचा वीजदर आणि त्या सुविधेद्वारा वीज निर्मितीचा प्रत्यक्ष खर्च यांमधील फरकाची त्यांना भरपाई करण्यात येते. त्यासाठीची रक्कम (दरमहा ३०० युनिटहून कमी वीजवापर करणारे ग्राहक वगळता) सर्व ग्राहकांकडून त्यांच्या महिन्यातील वीजवापरावर सुमारे ४२ पैसे/कि.वॅ. तास दराने (रिलायबिलीटी चार्जेस्) गोळा करण्यात येते.

## ८. **वीजदर प्रस्ताव :-**

सध्या अस्तित्वात असलेले वीजदर आणि ग्राहकांच्या प्रत्येक प्रवर्गाबाबतीत टक्केवारीतील वाढीसह प्रस्तावित वीजदर यांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. तक्ता १ व तक्ता २ वर दिलेल्या तपशिलाप्रमाणे महावितरण यांच्या एकूण महसुलाच्या गरजेत वीज खरेदीवरील खर्चाचा वाटा फार मोठा (सुमारे ७६% ) आहे. मुख्यत्वे रत्नागिरी गॅस अँड पॉवर कंपनीकडून घ्यावयाच्या वीजेच्या परिमाणातील वाढ, महानिर्मिती यांच्याकडील वीज निर्मिती खर्चातील वाढ यामुळे वीज खरेदीवरील खर्चात वाढ होत असल्यामुळे वीज दरात वाढ करणे आवश्यक झाले आहे.

९) स्वारस्य असणा-या कोणत्याही व्यक्तीकरीता / संस्थेकरीता महावितरण यांनी त्यांच्या प्रस्तावाचा इंग्रजी व मराठी भाषेतील कार्यकारी सारांश आणि /अथवा तपशिलवार याचीकेचे दस्त ऐवज यातील माहिती सीडी वर उपलब्ध करुन द्यावी/ असे निदेश आयोगाने दिले आहेत.

१०) महावितरण यांच्या कार्यालयातून पूढील दस्तऐवजांच्या प्रति लेखी विनंती वरुन प्राप्त करता येतील.

- क) प्रस्तावाचा कार्यकारी सारांश ( मराठी किंवा इंग्रजी भाषेतील), विणामुल्य.
- ख) तपशिलवार याचिकेचे दस्तऐवज (इंग्रजी भाषेतील सीडीसह) , रोख रुपये ३०० किंवा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांच्या नावाने काढलेल्या त्याच रकमेच्या दर्शनि धनाकर्ष/ धनादेशा द्वारे प्रदान केल्यास.
- ग) तपशिलवार याचिकेचे दस्तऐवज (केवळ इंग्रजी भाषेतील छापील मजकूर) रुपये २५०/-
- घ) तपशिलवार याचिकेच्या दस्तऐवजाची सीडी (केवळ इंग्रजी भाषेत) रुपये ५०/-

**मुख्य कार्यालय :**

अधिक्षक अभियता (वीनिक), वीजदर नियामक कक्ष,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
५वा मजला, प्रकाशगड,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१

**परिमंडल कार्यालय :**

| | | |
|---|---|---|
| १. मुख्य अभियंता (सं.व सु.),<br>म.रा.वि.वि.कं.मर्या.,<br>भांडुप शहर परिमंडल<br>विद्युत भवन,लाल बहादुर मार्ग,<br>भांडुप, मुंबई-४०००७८<br>एसटीडी कोड : ०२२<br>दूरध्वनी : २५६४३९८१<br>फॅक्स : २५६४३९९०<br>ई-मेल<br>cebhandup@mahadiscom.in | २. मुख्य अभियंता (सं.व सु.),<br>म.रा.वि.वि.कं.मर्या.,<br>कल्याण परिमंडल, तेजश्री,<br>जहांगिर मैदान, कर्णिक रस्ता,<br>कल्याण-४२१३०१<br>एसटीडी कोड :०२५१<br>दूरध्वनी :२३२८२८३<br>फॅक्स : २३२९४८८<br>ई-मेल<br>cebkalyan@mahadiscom.in | ३. मुख्य अभियंता (सं.व सु.),<br>म.रा.वि.वि.कं.मर्या.,<br>कोंकण परिमंडल,रत्नागिरी,<br>नविन प्रशासकीय इमारत,<br>नाचणे रोड,<br>रत्नागिरी-४१५६३९<br>एसटीडी कोड :०२३५२<br>दूरध्वनी :२२५८५३<br>फॅक्स :२२६५०४<br>ई-मेल<br>cekonkan@mahadiscom.in |
| ४. मुख्य अभियंता (सं.व सु.),<br>म.रा.वि.वि.कं.मर्या.,<br>कोल्हापूर परिमंडल,<br>प्रशासकीय इमारत,ताराबाई पार्क,<br>कोल्हापूर-४१६००३<br>एसटीडी कोड :०२३१<br>दूरध्वनी :२६५०५८२<br>फॅक्स :२६५८०६०<br>ई-मेल<br>cekolhapur@mahadiscom.in | ५. मुख्य अभियंता (सं.व सु.),<br>म.रा.वि.वि.कं.मर्या.,<br>लातूर परिमंडल, लातूर,<br>एसटीडी कोड :०२३८२<br>दूरध्वनी :२५३८६६<br>फॅक्स :२५१८६६<br>ई-मेल<br>celatur@mahadiscom.in | ६. मुख्य अभियंता (सं.व सु.),<br>म.रा.वि.वि.कं.मर्या.,<br>नाशिक परिमंडल,<br>विद्युत भवन,नाशिक रोड,<br>नाशिक: ४२२१०१<br>एसटीडी कोड :०२५३<br>दूरध्वनी :२४६२४९१<br>फॅक्स : २४६१५८१<br>ई-मेल<br>cenashik@mahadiscom.in |
| ७. मुख्य अभियंता (सं.व सु.),<br>म.रा.वि.वि.कं.मर्या.,<br>पुणे परिमंडल,प्रशासकीय इमारत,<br>रास्ता पेठ,पुणे:४११०११<br>एसटीडी कोड :०२०<br>दूरध्वनी :२६१३१३८९<br>फॅक्स :२६१३२०५२<br>ई-मेल<br>cepune@mahadiscom.in | ८. मुख्य अभियंता (सं.व सु.),<br>म.रा.वि.वि.कं.मर्या.,<br>अमरावती परिमंडल,विद्युत भवन,<br>रतनलाल प्लॉट,<br>अकोला-४४४००५<br>एसटीडी कोड :०७२४<br>दूरध्वनी :२४३४४७६<br>फॅक्स :२४३८०२५<br>ई-मेल<br>ceakola@mahadiscom.in | ९. मुख्य अभियंता (सं.व सु.),<br>म.रा.वि.वि.कं.मर्या.,<br>औरंगाबाद परिमंडल,<br>विद्युत भवन,डॉ.बाबासाहेब<br>आंबेडकर मार्ग,<br>औरंगाबाद:४३१००१<br>एसटीडी कोड :०२४०<br>दूरध्वनी :२२३३४०६५<br>फॅक्स :२३३१०५६<br>ई-मेल<br>ceaurangabad@mahadiscom.in |
| १०. मुख्य अभियंता (सं.व सु.),<br>म.रा.वि.वि.कं.मर्या.,<br>नागपूर ग्रामिण परिमंडल,<br>विद्युत भवन, काटोल रोड,<br>नागपूर:४४००१३<br>एसटीडी कोड :०७१२<br>दूरध्वनी :२५९११९७६<br>फॅक्स :२५९११९२७<br>ई-मेल :<br>cenagpur@mahadiscom.in | ११. मुख्य अभियंता (सं.व सु.),<br>म.रा.वि.वि.कं.मर्या.,<br>नागपूर शहर परिमंडल,<br>प्रकाश भवन, लिंक रोड,<br>नागपूर-४४०००१<br>एसटीडी कोड :०७१२<br>दूरध्वनी :२५३१५६१<br>फॅक्स :२५२०१७८<br>ई-मेल<br>cenagpur@mahadiscom.in | |

११) महवितरण यांनी त्यांच्या याचिकेवर सदर सुचनेद्वारे जनतेकडुन अभिप्राय आणि सूचना मागवाव्यात असे निदेश आयोगाने दिले आहे. त्यानुसार अभिप्राय/सूचना यांची प्रत अधिक्षक अभियंता (वीजदर नियामक कक्ष),म.रा.वि.वि.कं.मर्यादित, ५वा मजला, प्रकाशगड, बांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ यांना पाठविल्याच्या पुराव्यासहीत सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३वा मजला, सेंटर १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४००००५ (फॅक्स क्र.०२२-२२१६३९७६, ई-मेल mercindia@mercindiaorg.in ) यांना दिनांक १४ ऑगस्ट २००६ पर्यंत मिळेल अश्या बेताने पाठवावी.

१२) स्वारस्य असलेल्या कोणत्याही व्यक्तीने आपले आक्षेप, सुचना किंवा अभिप्राय यांच्या इंग्रजी किंवा मराठी भाषेतील सहा प्रती ही सूचना प्रसिध्द झाल्यापासून तीन आठवडयांत परंतु उशीरात उशीरा २१ ऑगस्ट २००६ पूर्वी पाठवाव्यात. आक्षेपतानी आपले संपूर्ण नांव, पोस्टाचा पत्ता व असल्यास ई-मेल पत्ता सोबत नमूद करावा. आक्षेप/सूचना एखादी संघटना किंवा ग्राहकांचा गट यांच्यावतीने सादर केल्या जात असतील तर तसे स्पष्ट नमूद करावे. आक्षेपकानी जाहिर सुनावणीस उपस्थित रहाण्याची इच्छा नमूद केलेली असल्यास पुढील ठिकाणी घेण्यात येणाऱ्या जाहिर सुनावणीस उपस्थित रहाण्याची संधी आयोगाकडून देण्यात येईल व त्याकरिता कोणतीही निराळी सूचना दिली जाणार नाही.

| अ. क्र. | जाहिर सुनावणीचे ठिकाण | दिनांक | वेळ | वार |
|---|---|---|---|---|
| १. | अमरावती : विभागीय आयुक्तांचे कार्यालय येथील सभागृह, अमरावती | १७.०८.२००६ | सकाळी १०.०० वाजता | गुरुवार |
| २. | नागपूर : विभागीय आयुक्तांचे कार्यालय येथील सभागृह, नागपूर | १८.०८.२००६ | सकाळी १०.०० वाजता | शुक्रवार |
| ३. | औरंगाबाद : विभागीय आयुक्तांचे कार्यालय येथील सभागृह, औरंगाबाद | २१.०८.२००६ | सकाळी १०.०० वाजता | सोमवार |
| ४. | नाशिक : बचत भवन, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, नाशिक | २२.०८.२००६ | सकाळी १०.०० वाजता | मंगळवार |
| ५. | पुणे : विभागीय आयुक्तांचे कार्यालय येथील सभागृह, पुणे | २४.०८.२००६ | सकाळी १०.०० वाजता | गुरुवार |
| ६. | मुंबई : यशवंतराव चव्हाण ऑडीटोरियम, मंत्रालयासमोर, जनरल जगन्नाथ भोसले मार्ग, मुंबई-४००००५ | २५.०८.२००६ | सकाळी ११.०० वाजता | शुक्रवार |

१३) स्वारस्य असलेल्या व्यक्तीना संबंधित विभागीय मुख्यालयांतील सुनावणीस हजर रहाणे शक्य नसेल तर ते मुंबई येथून सुनावणीत भाग घेऊ शकतात.

१४) महावितरण यांनी विहीत कालावधीत प्राप्त झालेल्या आक्षेपास/सूचनेस/अभिप्रायास ते प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन दिवसात उत्तर दिले पाहिजे. महावितरण यांच्या उत्तरावर ते प्राप्त झाल्यापासून एक आठवडयात परंतु उशीरात उशीरा २५ ऑगस्ट २००६ पर्यत आक्षेप आपले उत्तर सादर करु शकेल. मात्र दोन्ही प्रकरणी आयोगास सहा प्रती प्रुष्ठांकित करण्यात याव्यात.

१५) तपशिलवार याचिकेचे दस्तऐवज, आधार सामग्री आणि कार्यकारी सारांश इत्यादि मजकूर महावितरण यांच्या वेबसाईटवरुन (http://www.mahadiscom.in) डाऊन लोड करुन घेण्यास उपलब्ध आहेत. त्याप्रमाणे आयोगाच्या वेबसाईटवरुन (http://www.mercindia.org.in) कार्यकारी सारांशाचा मराठी व इंग्रजी भाषेतील मजकूर विना मूल्य उपलब्ध करुन घेता येईल.

**संचालक (संचलन),**
**महावितरण**

D:\MSEDCL General Suchana १७.७.०६.doc

| ग्राहकांचा प्रवर्ग, आणि वीजवापराचा टप्पा | विद्यमान दर | | | | प्रस्तावित दर | | वीजदरातील वाढ % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थिर आकार रु./महिना | विद्युत आकार (पैसे प्रति युनिट) | नियामक दायित्व आकार (पैसे प्रति युनिट) | इंधन समायोजन आकार (पैसे प्रति युनिट) | स्थिर आकार (रु/महिना) | विद्युत आकार (पैसे प्रति युनिट) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| **कमीदाब प्रवर्ग** | | | | | | | |
| **घरगुती** | | | | | | | |
| ० ते ३० युनिटस् | २० | १२५ | | ९६ | २५ | २६५ | २०% |
| ३१ ते ३०० युनिटस् | ४० | २९० | | ९६ | ६० | ४५० | २४% |
| ३०० युनिटपेक्षा अधिक | ४० | ४०० | | ९६ | ६० | ६४० | २७% |
| थ्री फेज ग्राहकांकरिता स्थिर आकार | १०० | | | | २०० | | |
| १० कि.वॅा.पेक्षा अधिक संलग्न भाराकरिता स्थिर आकार | १० कि.वॅा.च्या पुढील प्रत्येक १० कि.वॅा. भारासाठी किंवा त्याच्या भागासाठी रु.१०० | | | | १० कि.वॅा.च्या पुढील प्रत्येक १० कि.वॅा. भारासाठी किंवा त्याच्या भागासाठी रु.२०० | | |
| **वाणिज्यिक** | | | | | | | |
| **० ते १०० युनिटस्** | १०० | २४० | ५० | ९६ | १०० | ५०० | |
| १०१ ते २०० युनिटस् | १०० | ३१५ | ५० | ९६ | १०० | ६०० | |
| २०० युनिटपेक्षा अधिक | १०० | ४१० | ५० | ९६ | १०० | ७२० | |
| थ्री फेज ग्राहकांकरिता स्थिर आकार | १५० | - | - | - | २५० | - | |
| १० कि.वॅा.पेक्षा अधिक जोडलेल्या भाराकरिता अतिरिक्त स्थिर आकार | १० कि.वॅा.च्या पुढील प्रत्येक १० कि.वॅा. भारासाठी किंवा त्याच्या भागासाठी रु.१५० | - | - | - | १० कि.वॅा.च्या पुढील प्रत्येक १० कि.वॅा. भारासाठी किंवा त्याच्या भागासाठी रु.४०० | - | २८% |
| कमाल मागणी आधारित वैयक्तीक दर | रु.२२०/केव्हीए/ महिना | - | - | - | रु.२२०/केव्हीए/ महिना | - | |
| **कमी दाब,औद्योगिक (यंत्रमागासहित)** | | | | | | | |
| ० ते १००० युनिटस् | रु.६०/अश्वशक्ती/ महिना | २३० | ५० | ९६ | रु.१००/अश्वशक्ती/ महिना | ४८० | |
| १००० युनिटसपेक्षा अधिक | रु.६०/अश्वशक्ती/ महिना | २५० | ५० | ९६ | रु.१००/अश्वशक्ती/ महिना | ५१० | |
| कमाल मागणी आधारित वैयक्तीक दर | रु.२२०/केव्हीए/ महिना | - | - | - | अनिवार्य रु.२२०/केव्हीए/ महिना | - | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दिवसाच्या समयानुरुप आकार (टीओडी),वैकल्पिक | - | - | - | - | अनिवार्य टीओडी आकार | | ३१% |
| रात्री १०.०० ते सकाळी ६.०० | ० | -७५ | - | - | ० | -५० | |
| सकाळी ६.०० ते सकाळी ९.०० | ० | ० | - | - | ० | ० | |
| सकाळी ९.०० ते दुपारी १२.०० | ० | ५० | - | - | ० | १०० | |
| दुपारी १२.०० ते सायंकाळी ६.०० | ० | ० | - | - | ० | ० | |
| सायुंकाळी ६.०० ते रात्री १०.०० | ० | ९० | - | - | ० | १५० | |
| **कमीदाब, सार्वजनिक पाणी पुरवठा केंद्रे** | | | | | | | |
| शहरी पाणी पुरवठा | रु.६०/अश्वशक्ती/ महिना | २४० | - | ९६ | रु.९०/अश्वशक्ती/ महिना | ४०० | २८% |
| ग्रामीण पाणी पुरवठा | | | | | | | |
| ग्रामपंचायत | रु.२५/अश्वशक्ती/ महिना | १५० | - | ९६ | रु.५०/अश्वशक्ती/ महिना | २५० | |
| मिटर आधारित दर (क वर्ग नगरपालिकांसहित) | रु.३५/अश्वशक्ती/ महिना | १५० | - | ९६ | रु.६०/अश्वशक्ती/ महिना | ३०५ | |
| **कमी दाब, कृषि सरसकट दर** | | | | | | | |
| वर्गवारी-एक मंडले् (वार्षिक वीज वापर १३०० तास/ अश्व-शक्तीहून कमी असलेली | रु.१५०/अश्व-शक्ती/ महिना | - | - | रु.६३/ अश/म. | रु.२१३/अश्वशक्ती/ महिना | - | ०% |
| वर्गवारी-दोन मंडले् (वार्षिक वीज वापर १३०० तास/ अश्व-शक्तीहून कमी असलेली | रु.१८०/अश्व-शक्ती/ महिना | - | - | रु.७४/ अश/म. | रु.२५५/अश्वशक्ती / महिना | - | |
| मिटर आधारित वीजदर (कुक्कुट पालन केंद्रासहित) | रु.१५/अश्व-शक्ती/ महिना | ११० | - | ९६ | रु.१५/अश्व-शक्ती/ महिना | २०६ | |
| **रस्त्यावरील दिवे** | | | | | | | |
| ग्रामपंचायती आणि क वर्ग नगरपरिषदा | रु.३०/कि.वॅा./ महिना | २१० | - | ९६ | रु.५०/कि.वॅा./ महिना | ३८० | २७% |
| महानगरपालिका | रु.३०/कि.वॅा./ महिना | २५० | - | ९६ | रु.५०/कि.वॅा./ महिना | ४३० | |

| ग्राहकांचा प्रवर्ग, आणि वीजवापराचा टप्पा | विद्यमान दर | | | | प्रस्तावित दर | | वीजदरातील वाढ % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थिर आकार रु./महिना | विद्युत आकार (पैसे प्रति युनिट) | नियामक दायित्व आकार (पैसे प्रति युनिट) | इंधन समायोजन आकार (पैसे प्रति युनिट) | स्थिर आकार (रु/महिना) | विद्युत आकार (पैसे प्रति युनिट) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| **उच्च दाब प्रवर्ग** | | | | | | | |
| एच टी पी-एक (मुम.प्र/पु.म.प्र.) | ३५० | २१५ | ५० | ९६ | ४०० | ४९५ | ३२% |
| एच टी पी -दोन (इतर) | ३३० | २१० | ५० | ९६ | ३८० | ४९० | ३३% |
| हंगामी ग्राहक | ३५० | ३०० | - | ९६ | ४०० | ५४५ | |
| **दिवसाच्या समयानुरुप आकार (टीओडी)** | | | | | | | |
| रात्री १०.०० ते सकाळी ६.०० | ० | -८५ | - | - | ० | -५० | |
| सकाळी ६.०० ते सकाळी ९.०० | ० | ० | | | ० | ० | |
| सकाळी ९.०० ते दुपारी १२.०० | ० | ६० | - | - | ० | ११० | ० |
| दुपारी १२.०० ते सायंकाळी ६.०० | ० | ० | - | - | ० | ० | |
| सायुंकाळी ६.०० ते रात्री १०.०० | ० | १०० | - | - | ० | १८० | |
| एच टी पी-तीन पाणी पुरवठा (मुम.प्र/पु.म.प्र.) | ३५० | २१५ | - | ९६ | ३८० | ४०० | २५% |
| एच टी पी -चार पाणी पुरवठा व इतर | ३३० | २१० | - | ९६ | ३८० | ३९० | २५% |
| **दिवसाच्या समयानुरुप आकार (टीओडी)** | | | | | | | |
| रात्री १०.०० ते सकाळी ६.०० | ० | -८५ | - | - | ० | -५० | |
| सकाळी ६.०० ते सकाळी ९.०० | ० | ० | - | - | ० | ० | |
| सकाळी ९.०० ते दुपारी १२.०० | ० | ६० | - | - | ० | ११० | ० |
| दुपारी १२.०० ते सायंकाळी ६.०० | ० | ० | - | - | ० | ० | |
| सायुंकाळी ६.०० ते रात्री १०.०० | ० | १०० | - | - | ० | १८० | |
| एच टी पी-पाच | (रेल्वे) | ३३५ | ५० | ९६ | - | ६१० | २७% |
| एच टी पी -सहा | | | | | | | |
| निवासी संकुले | १२५ | २२० | - | ९६ | २०० | ४०५ | ३१% |
| व्यापारी संकुले | १२५ | ३५० | - | ९६ | २०० | ५७५ | |
| एच टी पी ज्ञसात (कुक्कुटपालन कृषि -उच्च तंत्रासहित | रु.२५/अश्वशक्ती/ महिना | १३० | - | ९६ | रु.७५/अश्वशक्ती/ महिना | २६५ | २८% |
| मुळा प्रवरा विद्युत सहकारी संस्था | २०० | १४० | - | ९६ | २०० | ३०० | २२% |
| टाटा पॉवर कंपनी | ६०० | २९९ | - | ९६ | ६०० | ५०० | ०% |